# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६६१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १०/१०/२०१६

**१) बसमधील टिकीट ट्रे बॅगची चोरी . :–**

दिनांक ०८/१०/२०१६ चे १४.०० ते २१.३० वा. दर. यातील फिर्यादीने राज्य परिवहन बस क्र. एमएच ४० ए ६२३८ भंडारा ते काटोल बस फेरी मध्ये टिकीट ट्रे बॅग कि. ११,३१९/–रू. ची बस मधील रॅक मध्ये ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने नजर चुकवुन बसस्थानक भंडारा येथुन चोरून नेल्याने असे फिर्यादी सचीन् वसंतराव शिरसागर वय ३८ वर्ष रा. एमएसईबी कॉलोनी भंडारा (वाहक एसटी डेपो भंडारा) यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) विवाहीतेचा शारीरीक व मानसीक छळ केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक माहे. ०८/२०१५ रोजी ते ०७/१०/२०१६ पर्यत यातील पिडीत फिर्यादीला माहेरून ५ ते १० हजार रूपये आण या कारणावरून आरोपीतांनी शारीरीक व मानसीक त्रास देवुन छळ केल्याने व महीला समुपदेशन केंद्र तुमसर येथे तडजोड न झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ४९८(अ) भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चिंचखेडे पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**३) विद्युत करंट लागल्याने मुलीचा मृत्यु . :–**

दिनांक ०९/१०/२०१६ रोजी ०८.३० वा. दर. यातील मृतक कु. मयुरी राजु कुर्झेकर वय १२ वर्ष, रा. बाम्हनी ही फरशी पुसुन झाल्यावर फरशी वाळविण्याकरीता पंख्याची बटन सुरु करण्याकरीता गेली असता बोर्ड मधुन १ वायर निघुन तिच्या डाव्याहातावर पडुन इलेक्ट्रीकचा पॉवर सप्लाय असल्याने तिला इलेक्ट्रीकचा करंट लागल्याने उपचारा करीता ग्रामीण रुग्नालय पवनी येथे नेले असता डॉ. नी तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी राजु लक्ष्मण कुर्झेकर वय ३६ वर्ष, रा. बाम्हनी यांचे तोंडी व डॉ मेमो वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरखडे पो.स्टे. पवनी हे करीत आहे.

**४) अवैध दारु अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०९/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. भंडारा, करडी व लाखनी येथील अवैध दारु अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करुन आरोपीतांच्या ताब्यातुन १३३ लिटर हातभट्टी दारु+सडवा+ साहीत्य कि. ३७,०००/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता